▌निमित्ताने▌

# सार्थ पुरस्कार!

उर्मिला पवार

‘संबोधी प्रतिष्ठान, सातारा’ या संस्थेने यंदाचा २०वा ‘माता भिमाई’ पुरस्कार आशालता कांबळे यांना प्रदान केला आहे त्यासाठी आशालता यांचे मनापासून अभिनंदन! सातारा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातेचं - भिमाबाई रामजी आंबेडकर यांचं स्मारक आहे. बाबासाहेबांसारख्या क्रांतिसूर्याला जन्म देऊन त्या मातेने इथल्या भूमीत प्राण त्यागला. ती आठवण इथल्या प्रत्येकाचं मन व्यापून आहे.

भिमाईने एक स्त्री म्हणून आपल्या आयुष्यात केलेली वाटचाल साधी नव्हती. परमुलुखात रहाणं, अहोरात्र घरातली सर्व कामं, जबाबदाऱ्या सांभाळणं, शेजाऱ्या पाजाऱ्याकडून केला जाणारा दुःस्वास, छळ सोसणं, चौदा मुलांना जन्म देणं, वाढवणं, सात मुलांच्या अकाली जाण्याची जीवघेणी वेदना सोसत वावरणं आणि त्यातच इंगळीसारखा वेळीअवेळी डसणारा, उभं आयुष्य पिंजून ठेवणारा मस्तकशूळ...! स्त्रीला आणखी एक पाचवं ज्ञानेंद्रिय असत म्हणतात आणि ते असतं तिची बाई म्हणूनची संवेदना. त्या संवेदनेची ताकद बहुप्रसवा असते. बाईला अनेक गोष्टींचं ती जसं आकलन देते तसच अनंत मरणातूनही ती संवेदना तिला जागृत ठेवत असते. म्हणूनच की काय ती भयंकर डोकेदुखी सोसत, वेदनेच्या गळामिठीत तडफडतानाही भिमाई सचेत रहात भीमबाळावर पाखर घातत राहिल्या. त्या मातेच्या मनातल्या जगण्याच्या उमेदीचा, आशा आणि चेतनेचा आदर करावा, त्या मातेबाबतची ऋणसंवेदना तशाच कणखर स्त्रीच्या गौरवाने जागावावी या अपूर्व इच्छेने साताऱ्यात ‘संबोधी प्रतिष्ठान’ १९९८पासून झटत आहे.

आशालता कांबळे ही कोकणातल्या मालवण तालुक्यातील कांदळगाव या खेड्यात जन्मलेली अतिशय संवेदनशील अशी लेखिका. कोकणातलं अठरा विश्वे दारिद्र्य, तिथली जातीयता, आणि बाई म्हणून वाट्याला आलेली घुसमट आशालतांनी घरापासूनच पाहिली, अनुभवली आहे. कांदळगांव आणि मालवण येथे कसं बसं शिक्षण घेत पुढे मुंबईत येऊन प्राध्यापक झालेल्या आशालता विध्यार्थीदशेतच राष्ट्र सेवा दल आणि छात्रभारतीच्या शाखांमधून सामाजिक कार्याकडे वळल्या. फुले आंबेडकरी विचार अभ्यासताना त्यांना आजुबाजूच्या समाजाचं भान येत गेलं. मीही कोकणातली त्यामुळे आशालतांविषयी मी ऐकून होते पण आम्ही भेटलो ते मुंबईत आणि मग भेटतच राहिलो.

लेखक मुंबईस्थित असून साहित्यिक असून त्यांचे आयदान हे आत्मचरित्र तसेच आम्हीही इतिहास घडवला ही पुस्तके महत्त्वपूर्ण आहेत.
ईमेल pawar.urmila@yahoo.com

प्रकाशन दिनांक १-१२-२०१७

त्यांचं व्यक्तिमत्व चार चौघींसारखं असलं तरी बुद्धीची चमक असाधारण आहे. कुणालाही खोडता येणार नाही असा आपला विचार ठामपणे मांडण्याची आणि शांतपणे पायरी पायरीने तो पटवून देण्याची आशालता यांची विशेष हातोटी आहे. ही हातोटी जितकी त्यांच्या शिक्षकी पेशातून जितकी आलेली आहे त्याहून अधिक ती त्यांनी त्यांनी प्रतिकूल परिस्थिती आणि विचारांशी झगडत घडवलेली आहे. त्यांची मतं त्या कठोर अभ्यासातून व्यक्त करत असतात. विशेषत: स्त्री प्रश्नांची त्यांची मांडणी मनूवाद्यांना आत्मपरीक्षण करायला लावणारी असते.

भारतीय संस्कृतीने स्त्रियांचं चित्र फक्त पुरुषाला हवं तसं उभं केलं आहे. अग्निदिव्य करणारी सीता, कोणतंच अस्तित्व नसलेली उर्मिला, पतीच्या व्यक्तिमत्त्वात स्वत:चं व्यक्तिमत्त्व लुप्त करून टाकणारी लोपामुद्रा, पतीचे पाय चेपत बसलेली लक्ष्मी अशा स्त्रिया आदर्श म्हणून समाजमनावर बिंबवताना स्त्रियांना 'अबला' ठरवून त्यांचं खच्चीकरण केलं गेलं. प्रत्यक्षात स्त्री अबला नाही. ती अतिशय सक्षम आहे, कोणत्याही प्रसंगाला कोमल आणि कणखर अशा दोन्ही भावनांनी सामोरं जाण्याची विलक्षण ताकद स्त्रीकडे आहे हे आशालता अधोरेखित करतात. भिमाईसारखाच वेदनेचा पहाड पायाखाली घालत आयुष्याकडे सकारात्मकतेने पहाणाऱ्या अशा अनेक समर्थ स्त्रिया त्यांच्या कविता, कथा, ललित लेख आणि समीक्षेचा विषय झाल्या आहेत.

अडीच हजार वर्षांपूर्वी लिहिलं गेलेलं पहिलं स्त्री साहित्य म्हणून गौरवास पात्र असलेल्या ७३ थेरी आणि त्यांच्या ५२२ गाथा आजवर उपेक्षितच राहिल्या. स्त्री म्हणून आपला सन्मान सांभाळत सर्व तऱ्हेच्या प्रश्नांना, नकारांना तोंड देत प्रज्ञावंत झालेल्या त्या काळातही विज्ञानवादी दृष्टी असलेल्या माता यशोधरा, गौतमी, पटाचारा, मुक्ता, सोमा, उब्बिरी अशा थेरींचा परिचय 'समर्थ स्त्रियांचा इतिहास' या पुस्तकातून अतिशय अभ्यासपूर्णतेनं आशालतानी वाचकांना करुन दिला आहे.

जिजाबाई या केवळ शिवरायांच्या आई म्हणूनच थोर नाहीत तर राजकारणातील अनंत मरणे सोसत त्यांनी दाखवलेला स्वाभिमान आणि त्यांची अफाट निर्णयक्षमता यांचा बारकाईनं अभ्यास व्हावा असा विचार आशालता नमूद करतात. अशाच अफाट निर्णयक्षमतेने आणि स्वाभिमानाने राज्यशकट चालवणाऱ्या महाराणी अहिल्याबाई होळकर यांचं कर्तृत्व व पराक्रम इथल्या व्यवस्थेने नजरेआड करून त्यांच्या हातात शंकराची पिंड देऊन त्यांची प्रतिमा अतिशय श्रद्धाळू अशीच इतिहासाच्या पानावर रंगवली आहे याबद्दल आशालता खंत व्यक्त करतात. बहिणाबाईच्या कवितांचं समीक्षण करताना आशालतांनी उलगडून दाखवलेली बहिणाबाईच्या प्रतिमा आणि प्रतीकांमधली चिंतनशीलता, सुजाणता बहिणाबाईकडे असलेल्या पाचव्या ज्ञानेंद्रियाच्या शक्तीचंच दर्शन देते. 'बहिणाबाई एक आकलन' हे समीक्षात्मक पुस्तक सहज सुंदर भाषेमुळे वाचनीय झालेले आहे.

अनंत दु:खे भोगूनही जगण्यावरची निष्ठा जराही ढळू न देता गावखेड्यात वावरणाऱ्या त्यांच्या आईने, तसेच आजूबाजूच्या स्त्रियांनी त्यांच्या नेणिवेचा कोपरा व्यापलेला आहे. 'आमची आई' या पुस्तकातून आपल्या आईविषयी लिहिताना 'शामची आई' हे पुस्तक त्यातली आई नकळत आशालताच्या मन:पटलावर उभी राहिलेली आहे. अपार काबाडकष्ट करणारी, घरीदारी कसल्याच सुरक्षिततेचा, आधाराचा लवलेशही सोबत नसताना मुलांना शिक्षण देत नीतीमान बनवणारी त्यांची आई किंबहुना अशा सर्वच कष्टकरी माता तितक्याच उंचीवर उभ्या आहेत हे आशालता जाणीवपूर्वक दाखवून देतात.

आशालता यांच्या लेखनाचं एक वैशिष्ट्य हे आहे की त्या स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या संविधान

**(पान ६६ वर)**



प्रकाशन दिनांक १-१२-२०१७

लग्न करावे वाटले तर ते करून टाकतात. एकदा केल्यावर एकनिष्ठ राहतात. प्रथम विवाह करणारा मुलगा किंवा मुलगी जेव्हा अशा द्वितीय विवाह स्थळाला सहज हो म्हणेल तेव्हा खरे तर नको असलेल्या विवाहातून बाहेर पडणे जास्त सहज होऊ शकेल. पूर्वी कसे माणूस एकदा नोकरीला चिकटला की आयुष्यभर तीच करायचा, आता मात्र सहजतेने नोकरी बदलणे होते, कारण दुसरी नोकरी सहजतेने मिळते. विवाहाबाबत मात्र तशी स्थिती आलेली नाही.

एकूण विचार केला तर समाजात अनेक चांगले बदल झालेले आहेत. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला त्यानंतर मुली आता शिकत आहेत. विवाहाबाबतही पूर्वीपेक्षा खूप सुधारणा झालेल्या आहेत. मात्र समाजव्यवस्था एकदम बदलत नसते. ती कुर्मगतीनेच बदलते. फार मोठे बदल एकदम होतील अशी मला अजिबात आशा नाही. सखाराम गटणे ह्या त्यांच्या व्यक्तीरेखेबाबत पुलंनी लिहिलेले आहे, त्याच्या जीवनातील साहित्याचा बोळा काढून टाकला व त्याचे जीवन प्रवाही झाले. तसे आपल्या समाजात जातीचा बोळा आहे. इतर बाबतीत जात न मानणारे लग्न करताना स्वजातीयच हवी ही अट पाळतात. तेव्हा हा जातीचा बोळा जाईपर्यंत आपल्या समाजात क्रांतिकारी बदल होणार नाहीत आणि जात जाणे सध्या तरी शक्य दिसत नाही. ह्या विषयाला पूर्णविराम असणे शक्य नाहीच. ●

---

**(उर्मिला पवार... पान ५८ वरून)**

मूल्यांची सतत पाठराखण करतात. ही मूल्यं ज्या कुणाच्या लेखनात सापडतात ते लेखन त्या उचलून धरतात. मनापासून त्याचं मूल्यांकन करून लेखकाची थोरवी उलगडून दाखवतात. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा त्यांनी आढावा घेतला आहेच शिवाय 'प्रेम आहे संस्कृतीचा सारांश' या आपल्या कवितेच्या एकाच ओळीतून कुसुमाग्रज जगणं किती सुंदर आणि सोपं करतात हे आशालतांनी तशाच सोप्या शब्दांत स्पष्ट केलय. तसंच वसंत बापट, विजया राजाध्यक्ष, फ्रान्सिस दिब्रिटो, प्रज्ञा दया पवार, रझिया पटेल ते अगदी नीलम माणगावे, मथु सावंत अशा अनेक प्रतिभावंतांच्या लेखनातील संविधान मूल्ये त्यांनी नेमकेपणानं वेचली आहेत.

आशालता कांबळे हे नाव साहित्य क्षेत्रापुरतंच मर्यादित नाही तर फुले आंबेडकरी चळवळीतही त्या सक्रीय आहेत. खैरलांजी, खर्डा, जवखेडा, सोनई या गेल्या १०-१२ वर्षातल्या घटनांच्या विरोधातले कृती कार्यक्रम असो की लेखन असो आशाताई त्या त्या वेळी अत्यंत सतर्क होत्या. तळागाळात, वस्तीपातळीवर संवाद साधत होत्या. 'दैनिक सम्राट', 'महानायक' अशा दैनिकांमधून दीर्घ काळ स्तंभलेख करून लोकाना अन्याय अत्याचाराच्या विरोधात उभं रहाण्याचं, संविधान मूल्ये जपण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. आजही त्या अनेक प्रश्नांवर, विशेषतः अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आपले विचार अत्यंत परखडपणे मांडत असतात.

आजच्या गतिमान जगात वावरताना एक तुटल्याची, फेकलेपणाची जाणीव घेऊन नवी पिढी बरीचशी वैफल्यग्रस्त जीवन जगत असते. त्यातून त्यांनी लवकरच बाहेर पडण्याची गरज असते हे ओळखूनच आशालता या महाविद्यालयीन मुलाचं इतकंच नाही तर विवाहितांचं आणि अगदी आबालवृद्धांचंही समुपदेशन करतात. कोणताही प्रश्न हिंसेने सुटत नाही, तो समुपदेशनातूनच सुटतो या तथागत बुद्धाच्या शिकवणीनुसार हे काम आणि बाई म्हणूनचे आपल्याही जगण्यातले अनेक काच आशालता आपल्या जवळच्या पाचव्या ज्ञानेंद्रियाने सोपे करतात. आशालता कांबळे यांना तसेच 'संबोधी प्रतिष्ठान' सातारा यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा! ●